# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०१९.

**दादा दामले (dadadamle@ gmail.com)**

===========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी हर्षलसारखा विक्षिप्त ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी झाला असावा, असे वाटते. त्यामुळे कोणाचाही कसल्याही प्रकारचा धाक वा दडपण सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर सध्या अत्यंत हूड व खोडकर झाली असावीत असे वाटते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना मात्र अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे स्वभाव हरहुन्नरी होईल, मनाचा मोठेपणा व्यक्त होईल, हातून मोठे कर्तृत्व घडेल; पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्यासाठी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या राशीच्या षष्ठ स्थानी रवि व मंगळ हे उष्ण प्रकृतीचे ग्रह असल्यामुळे शारीरिक उष्णता भडकून अंगावर फोड येणे, इजा होणे, ताप येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे, चोरी होणे, मानहानी होणे अशापैकी घटना घडण्याची दाट शक्यता दिसते. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल, सुखदायक व यशदायक होईल. शुक्रामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होईल; तर काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. पण हा शुक्र वृद्ध मंडळींना प्रतिकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला शनि ग्रह सर्वसाधारणपणे अनुकुल होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. पण शनिसह असलेल्या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच काही मंडळींकडून "वरून कीर्तन; आतून तमाशा " अशा प्रकारचे ढोंगी,धूर्त आचरण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होणे संभवते. काही मंडळींना कुमार्गी मित्राची बाधा त्रस्त करील. त्यामुळे गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर "श्रीगणपती स्तोत्रा"चे पठण करा व एकवीस वेळा "ओम गं गणपतये नमः: " मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकूल हानी असेच म्हणावे लागेल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, जिवावरचे प्रसंग, बेअब्रूचे प्रसंग अशापैकी प्रसंगांना सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. तसेच कौटुंबिक जीवनात कलह निर्माण होण्याची शक्यता दिसते. जीवनसाथीला अपार कष्ट करावे लागतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असेल व नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय प्रियजनांपासून दूरत्व झाल्यास अस्वस्थ व्हाल. जपा. रविसह मंगळ असल्याने संततीचे दृष्टीने मनस्तापदायक महिना असल्याचा अनुभव येईल. मुलांपैकी कोणाचे मनाविरुद्ध वागणे, कोणाचे आजारपण, काही मंडळींना स्थावरसंबंधीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता

आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या नोकरदार मंडळींना पूरक होईल व सुखशांती मिळेल. हितशत्रू पराभूत होतील. बुधामुळे कार्यसिद्धी होईल तर काहींना धनलाभ होणे संभवते. रवि -बुधासह असलेल्या शुक्रामुळे उच्च गुणवत्ता असूनही आपले कर्तृत्व सिद्ध कारणाची संधीच मिळणार नाही. येथील शुक्रामध्ये शुद्ध प्रेमभावना नसून केवळ कामुकता असते. त्यामुळे या राशीच्या प्रेमिकांनी जपावे. नपेक्षा नैराश्य आल्यास व्यसनाधीन व्हाल. जपा. काहींवर नसते आळ येणेही संभवते. पण या षष्ठ स्थानी असलेले बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर तेथील गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने काही युवकयुवतींना विवाहयोग येईल. काहींचे प्रेमसंबंध जुळून येतील, व ते घट्ट होतील. प्रेमिकांचे प्रेमविवाह होणे संभवते. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. अर्थलाभ होणेही शक्य आहे. वैवाहिक जीवनात अपेक्षित सुखसमाधान लाभेल. प्रवासयोग येतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा या काळात प्रसूतिसमय आहे त्यांना पुत्रप्राप्ती होण्याची शक्यता आहे. पण बुध ग्रह प्रतिकुल असल्याने काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले शनि - केतु अनारोग्यकारक असून काही मंडळींना एखाद्या मोठ्या आजारास तोंड द्यावे लागेल. काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार अशापैकी आजार त्रस्त करतील. अपघात भय आहे. जपा. केतूमुळे कुटुंबात वाद, गैरसमज, कलह निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच हा केतू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा अणू शकेल. या राशीच्या दशम स्थानी असेलला नेपच्यून केवळ गुप्त पोलीस खात्यात काम करत असणारांना व द्रव पदार्थाचा व्यापार असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा. तसेच दररोज नियमितपणे या राशीच्या पुरुषानी “ ओम नमः शिवाय” मंत्राचा व स्त्रियांनी “ओम शिवाय नमः:” मंत्राचा एक माळ जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार होणे संभवते. विशेष म्हणजे या राहूमुळे सतत अपमान होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मनात सूडभावना निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहांमुळे कुटुंबात असमाधानकारक घटना घडणे संभवते. तसेच कुटुंबात वाद, गैरसमज अशापैकी कारणानी भांडणतंटे, अन्य कटकटींचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या महिन्याच्या काळात या राशीच्या चतुर्थ -पंचम स्थानी असलेला रवि ग्रह या राशीच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल असून नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय तो अनारोग्यकारक असून अपघातकारकही आहे. जपा. त्याच्यामुळे नियोजित कामात दिरंगाई होणे, अडचणी येणे संभवते. त्याशिवाय मुलांपैकी कोणाच्या आरोग्याची चिंता त्रस्त करील. तसेच प्रियजनांपैकी
कोणाचे अन्य ठिकाणी स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या बुधामुळे संततीपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा बुध या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व अपेक्षित कार्यसिद्धी होईल. तसेच काहींना आर्थिक लाभ तर काहींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेला शुक्र ग्रह सर्व प्रकारच्या कलाकारांना कलेतील प्रगतीसाठी अनुकुल होईल; पण तो उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर कोणत्याही कलेत उच्च गुणवत्ता असूनही ती गुणवत्ता प्रकट करण्यास संधीच मिळणार नाही. तसेच या शुक्रात शुद्ध प्रेमभावना नसून कामुकता असल्याने मोहाला बळी पडणारांना मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. त्याचा

परिणाम म्हणून काही जण व्यसनाधीन होतील तर काहींवर नसते आळ येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे लवकर विवाहयोग संभवत नाही. तसेच शनि सह असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्थिर राहण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून ग्रह अध्यात्मिक उपासनेस अनुकुल असून ज्यांना अध्यात्माची मनापासून आवड आहे त्यांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे सहज शक्य होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. काहींना अर्थलाभ होणेही शक्य आहे. पण बाकी इतर जे घडणे अपेक्षित आहे ते घडेलच याची खात्री देता येत नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक आणि लाभदायक होईल. काही मंडळींच्या कर्तृत्वाने वरिष्ठ प्रभावित होतील. सर्व प्रकारचे सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना बढती, काहींना एखादे मनाचे स्थान, तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. रविसह असलेल्या मंगळ ग्रहामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल. प्रवासयोग येईल. पण सतत सावधानतेने आचरण करा. इजा होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व कौटुंबिक त्रास, कामात दिरंगाई, आर्थिक चिंता तसेच अनारोग्य अशापैकी कारणांनी दु:ख व निराशा पदरी येणे संभवते. पण महिन्याच्या प्रथमार्धात याच स्थानी असलेल्या बुधामुळे मित्रसुख मिळेल व शुक्रामुळे ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे अर्थलाभ, सर्व सुख मिळू शकेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते दृढ होतील. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहि त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. चतुर्थस्थानी असलेले बुध - शुक्र उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर बुधामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. पण शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलावंतांना आपल्या कलेत प्रगती करणे व कलेचा आनंद व सुखसमाधान मिळवणे सहज शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला शनि ग्रह व्यवसायस्थानास पूरक होईल पण तो गैरसमजुती निर्माण करील. त्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. तसेच काहींना अनारोग्याचा त्रास होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी शनि सह असलेला केतू अनुकुल असल्यामुळे खूपच सुखाचे होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे जलभय , विषभय आहे. त्यामुळे जलाशयापासून दूर राहा व बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल ग्रह अनुकुल असून तो व्यवसायात लाभकारक होईल. नोकरदार मंडळींना बढती मिळेल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्र आसणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला राहू अनुकुल असून त्याच्यामुळे काहींना अर्थलाभ तर काहींना परदेशगमन योग येईल. हितशत्रूंपासून रक्षण होईल, पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, उन्नतिकारक व आभदायक होईल. पण त्यासाठी महिन्याच्या पूर्वार्धात विचारपूर्वक आचरण झाले पाहिजे. कारण या काळात उष्णताविकारांपैकी घसा, मान, दाढा यांचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना डोळ्याचे आजार त्रस्त करतील. शिवाय महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या अस्वस्थ करण्याची शक्यता आहे. वाढता खर्च, अनपेक्षितपणे येणारी एखादी आर्थिक जबाबदारी कशी पूर्ण करावयाची याची चिंता त्रस्त करील. येणे असलेले धन मिळण्यास विलंब होईल; पण देणे मात्र द्यावेच लागेल, अशी परिस्थिती निर्माण होणे संभवते. जपा. यातून वाद, भांडणे होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. काही नोकरदार मंडळींच्या कर्तबगारीवर वरिष्ठ प्रसन्न होतील. काहींना बढती, काहींना मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण रवि सह असलेल्या बुध -शुक्रापैकी बुधामुळे शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच शुक्रामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळींना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हे बुध -शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर तेथील गुरु ग्रहाशी शुभ योग होईल; आणि त्यामुळे कौटुंबिक सुख, मित्रसुख व गृहसौख्य मिळेल. शुक्रामुळे ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेले शनि -केतु प्रतिकुल असून त्याच्यामुळे काही मंडळींना पोटाचे आजार त्रस्त करतील; तर या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण करतील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला नेपच्यून वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. पण या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे बुद्धी विकृत होणे संभवते. त्यामुळे हाती असलेल्या अधिकाराचा गैरवापर होणे, वाममार्ग धनाचा लोभ होणे, जुगाराचा नाद लागणे अशापैकी नको ते घडणे संभवते. जपा. शिवाय हा राहू संततीबाबत एखादी चिंता निर्माण करीतसे दिसते. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपुर्ण काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. कारण काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच आपल्याला कसला तरी आजार झाल्याची भावना त्रस्त करील. शिवाय फसवणूक होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असून अनारोग्यकारक होणे संभवते. त्यात सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा झाला असल्यास अकारण श्रम, दगदग होणे संभवते. त्याचा शारीरिक - मानसिक आरोग्यावर परिणाम होईल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर मन व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून सतत संयम व सहनशीलतेचे आचरण करणे जरूरीचे होईल. आर्थिक चिंता त्रस्त करतील. पण

धनस्थानी असलेल्या बुध -शुक्रामुळे धनलाभ होणे संभवते. तसेच कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. हे बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर तेथील गुरु ग्रहाबरोबर असतील. .पण येथील बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. गुरु ग्रहामुळे या राशीच्या

लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. प्रवासाचे योग येतील. पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. . काही भाग्यवान मंडळींना भूमिलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले शनि - केतू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करतील. कोणाशी पटणार नाही. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. काही मंडळींना मातेच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. जपा. केतुमुळे विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला हर्षल अपघातदर्शक आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच
चालवा. मोबाईल बंद ठेवा. केवळ या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल होईल व काही मंडळींना अधिकार पद तर काहींना सन्मानयोग प्राप्त होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति भावनाशील झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच नैराश्य त्यात असावे, असे वाटते. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना रवि -मंगळ-हर्षल हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार असून काही प्रमाणात बुध -शनि हे दोन ग्रहही प्रतिकुल असणार आहेत. पण त्याचबरोबर गुरु-शुक्र हे दोन ग्रह पूर्णपणे अनुकुल असतील व काही प्रमाणात बुध -शनि हे दोन ग्रह अनुकूल होतील. त्यामुळे या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना सुखदु:खाचे संमिश्र अनुभव येणे संभवते. रवि -मंगळ मानसिक अस्वस्थता निर्माण करतील व त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. तसेच या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत पीछेहाट होत असल्याचा अनुभव येईल. बुधामुळे काही मंडळींना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेल. तसेच आर्थिक नुकसान होईल व मित्रांशी शत्रुत्व निर्माण होईल. पण हा बुध धनस्थानी गेल्यावर अर्थलाभ होणेही संभवते. गुरु-शुक्र हे दोन शुभ ग्रह पूर्णपणे अनुकुल असून त्यांच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसायात वाढ करणे, प्रगती करणे शक्य होईल. समाधानकारक अर्थलाभ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा नवे आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. पण हा शनि भावंडाविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शनि बरोबर असणारा केतू दु:खदायक असण्याचीच शक्यता आहे. या राशीच्या पंचम स्थानी असलेला नेपच्यून आध्यात्मिक उपासनेस अनुकुल असल्यामुळे ज्यांना अध्यात्मात रस आहि त्यांना जुपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेला हर्षल वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय वा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे प्रवासयोग येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशंकराची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे पुरुषानी "ओम नम: शिवाय " मंत्राचा व स्त्रियांनी "ओम शिवाय नम: " मंत्राचा एक माळ जप करावा आणि "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा केवळ साडेतीन महिन्याचा काळ

शिल्लक राहिला आहे. तेवढा काळ मनावर संयम ठेवून व सहनशील बनून व्यतीत केलात तर भावी अनुकुल काळातील सुखाचा व प्रगतीचा आनंद लुटू शकाल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप देणाऱ्या परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या पूर्णपणे अनुकुलतेमुळे आरोग्य उत्तम राहील. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लेखक मंडळींचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. सतत मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. तसेच शनिसह असलेला केतू आर्थिक संकटे निर्माण करून त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला नेपच्यून वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या मंडळींनी चंचल मनस्थितीत कोणत्याही गोष्टीचा अति विचार करू नये. बुद्धीला ताण देऊ नये. नपेक्षा काही मंडळींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही संभवते. पण हा हर्षल दशम स्थानी असलेल्या कार्यक्षेत्रास पूरक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला राहू दीर्घायुष्य देणारा असून त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना अतिशय कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ प्राप्त करावा लागेल. शिवाय तो मैत्रीत बाधा आणण्याची शक्यताही आहे. पण या मंगळामुळे या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. दररोज स्नान करून “ओम गं गणपतये नमः: “ मंत्राचा एकवीस वेळा जप करा. तसेच “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे आणि “ श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक आणि लाभदायक होईल. पण सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यास थोडेही काही मनाविरुद्ध घडल्यास गहिरे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात कामाचा ताण व वरिष्ठांशी विरोध सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्याशिवाय सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कौटुंबिक जीवनात कोणाचे काही कारणाने स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ झाले तर नैराश्य येऊन प्रगतीत बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी शनि ग्रहासह केतू आहे तो मनोनुकुल घटना घडवील व दिलासा मिळेल. पण या केतूपासून अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या दशम स्थानी असलेला मंगळ ग्रह स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडविण्याची शक्यता आहे. पण तो औषधविक्रेत्यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. महिन्याच्या पूर्वार्धात बुध -शुक्र अनुकुल असून त्यांच्यामुळे अपेक्षित असे सर्व सुखसमाधान मिळू शकेल. नवे मित्र मिळतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात बुध ग्रह प्रतिकुल होणार असून मनस्तापदायकच असल्याचा अनुभव येईल. काहींना अनारोग्याचा त्रासही सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या व्ययस्थानी असलेला गुरु ग्रह आणि या राशीच्या तृतीय स्थानी असलेला नेपच्यून आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल. तसेच ज्यांना गूढ संशोधनात रस आहे त्यांना हा नेपच्यून अनुकुल व

प्रगतिकारक होईल.ज्यांना सामाजिक कार्याची मनापासून आवड आहे अशांना त्यांच्या कर्यात प्रगती करणे शक्य होईल. पण या गुरूमुळे कौटुंबिक जीवनात अपेक्षाभंगाचा मनस्ताप होण्याची शक्यता आहे.जपा. तसेच शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. .या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. हाती सत्ता असलेल्यांना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. पण त्यांनी तो मोह प्रयत्नपूर्वक आवरावाच. नपेक्षा "होत्याचे नव्हते होण्यास" वेळ लागणार नाही. मनात कपटी विचार येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तायत्रेय व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे व "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींना सध्या शनि ग्रहाची साडेसाती असून या महिन्याच्या काळात शनि ग्रहही व्ययस्थानी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनूनच आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय लहरी, चंचल असा घडण्याची शक्यता आहे. व्ययस्थानी असलेला शनि ग्रह मनस्तापदायक घटना घडविण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वकच करा. नपेक्षा नसते लचांड मागे लागेल. सतत मनस्ताप व मानहानी होणे संभवते. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेला नेपच्यून प्रतिकुल असून त्याच्यामुळे आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. शिवाय अन्य आर्थिक संकटे येणेही संभवते. जपा. असे झाले तर गहिरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. वास्तुसुखही मिळू शकणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला राहू
मनात कपटी विचार निर्माण करील. जपा. शिवाय त्याच्यापासून विष भय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. पण अन्य जातिधर्माचे मित्र असतील तर त्यांच्यापासून लाभ होईल.
शिवाय हितशत्रू पराभूत होतील. या राशीच्या काही मंडळींना पोटाचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात कामाचा ताण, विरोध, मानहानी होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या मंगळ ग्रहांमुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. बुध ग्रह पूर्णपणे अनुकुल असून त्याच्यामुळे मनोनुकुल घटना घडतील. मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान मिळेल. नवे मित्र मिळतील. शिवाय धनलाभ होणेही संभवते. पण शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी गेल्यावरच अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात स्वतंत्र व्यापार -व्यवसाय असणारांच्या कार्यात हा शुक्र अडचणी, अडथळे निर्माण करीतसे दिसते. जपा. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काहींच्या इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. काहींना वाहनसुख मिळेल. काहींना धनलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच विवाहेच्छूचे विवाह जुळून येतील व संपन्न होतील. मैत्रीत वाढ होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मनशक्ती व मनशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषांनी " ओम नम: शिवाय " मंत्राचा व

स्त्रियांनी “ओम शिवाय नमः” मंत्राचा एक माळ जप करावा तसेच “श्रीशिवलीलामृत “ स्तोत्राचे व”श्रीहनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करावे.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अतिशय कोमल झाली असल्यास त्यांना मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच उदासीनता येऊन गहिरे नैराश्य येत असावे असे वाटते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना घरीदारी या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल व मनस्ताप देणारा असा असल्याचा अनुभव येईल. इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. शिवाय जीवनसाथी व संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. भावनेच्या भरात भरकटत जाल. जपा. नोकरीत कामाचा व घरी चिंतेचा ताण सहन करावा लागेल. काही मंडळींनाच घरी वडील मंडळींचा विरोध; तर नोकरीत वरिष्ठांचा जाच व मानहानी सहन करावी लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णतेचे आजार होणे संभवते. काही मंडळींना शारीरिक-मानसिक कष्ट होतील; तर काहींना मूळव्याधीसारखे आजार त्रस्त करतील. छोटे अपघात होऊन हाडमोड होणेही संभवते. जपा. पाणी आणि वीज यांच्यापासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी महिन्याच्या पूर्वार्धात असलेले बुध -शुक्र या दोन ग्रहांपैकी केवळ शुक्रच सुखकारक होईल; पण बुधामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, दिरंगाई होणे, वाद, भांडणे होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण हे बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर त्याच स्थानी असलेल्या गुरु ग्रहाशी युती करत आहेत. त्यामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल व दशम स्थानी असलेला गुरु हे दोन्ही ग्रह उच्च बुद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असल्याने तसे कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल , प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल; पण तो विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करीतसे दिसते. त्याचप्रमाणे या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शनि -केतू पैकी शनीमुळे मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास असल्याने चिंतीत व्हाल. पण शनि सह असलेला केतु अनुकुल असल्याने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर या राशीच्या पुरुषानी नियमितपणे “ ओम नमः: शिवाय” मंत्राचा व स्त्रियांनी “ओम शिवाय नमः:” मंत्राचा एक माळ जप करावा व “शिवलीलामृत “ स्तोत्राचे व “हनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करावे.

**(१२) मीन -** या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे अकारण चिंता, मानसिक व्यग्रता व नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्तपोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी (वाचा स्थान) असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती व विचारशक्ती अतिशय चंचल, अस्थिर झाली असल्यास होणारे आचरणही अविचारानेच होत असले पाहिजे. अविचाराने खर्च होणे, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचे मन दुखावणे, विचित्र आचरण घडणे होत असावे, असे वाटते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करील. जपा. सुखासाठी काही करावयाचे तर त्यात यश येणे संभवत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला रवि ग्रह केंद्रस्थानी असल्याने दशम स्थानास पूरक

होईल; त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व सुखकारक होईल. पण तो अनारोग्यकारक असल्याने काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. पण महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळींना प्रतिकुल होईल व इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल. रोगप्रतिकारशक्ती कमी झाल्यास अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. मुलांपैकी कोणाच्या आजाराची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. भावनेच्या भरात भरकटत जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी रवि सह मंगळ असल्याने पतिपत्नीपैकी कोणाच्या आजारपणामुळे किंवा दोघांतही मतभेद, वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय किंवा गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले बुध -शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील व यश, कार्यसिद्धी, सुखसमाधान मिळेल. शुक्रामुळे कमी श्रमात धन मिळेल; तर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग्य आहि अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ मिळेल. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. पण हा अष्टम स्थानी असलेला शुक्र वयोवृद्ध मंडळींना त्रासदायक होईल. हे बुध -शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर बुध ग्रह प्रतिकुल होईल व त्यामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, दिरंगाई होणे, वाद, भांडणे होणे . अशापैकी घटना घडणे संभवते. पण शुक्र ग्रह पूर्णपणे अनुकुल असल्यामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या भाग्यस्थानी बुध -शुक्रासह असलेला गुरु ग्रहही अनुकुल होईल व मनोनुकुल असेच सर्व घडेल. विशेष करून अध्यात्मात रस असणाराना हा गुरु प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेले शनि- केतु प्रतिकुल असून शनिमुळे व्यावसायिकांच्या व्यवसायात आर्थिक पीछेहाट होणे, क्रान्तिकारक घटना घडणे संभवते. तसेच केतूमुळे या राशीच्या काही मंडळींना हातचा नोकरी-व्यवसाय सोडून नवे काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. आहे ती नोकरी वा व्यवसायच मनापासून करावा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====